**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०६ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना देशभरातून मानवंदना.**
- **दीक्षाभूमीसह विदर्भात सर्वत्र महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम; अनेक ठिकाणी 'ब्लड फॉर बाबासाहेब अभियान'.**
- **भाजपचे कालीदास कोळंबकर यांनी घेतली विधानसभेच्या हंगामी अध्यक्ष पदाची शपथ.**
- **नागपूरसह, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आगामी काही तासात हलक्या पावसाची शक्यता.**

महापरिनिर्वाण दिन

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूवनेश्वर इथं आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली. दादरच्या चैत्यभूमी स्मारक इथं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि  उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केलं. यावेळी चैत्यभूमी स्मारक इथं शासकीय मानवंदना आणि हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली. तसंच अशोक स्तंभाजवळील भीमज्योतीलाही मान्यवरांनी अभिवादन केलं. लेखक नरेंद्र जाधव लिखित 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या  पुस्तकाचं प्रकाशन  यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते करण्यात आलं. चैत्यभूमीवर आज  सकाळपासूनच अनुयायी आणि नागरिकांची गर्दी पहायला मिळत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सोयी-सुविधा केल्या असून पोलिसांचा बंदोबस्त चोख करण्यात आला आहे. तसंच पुस्तकांचे आणि प्रतिमा

विक्रीचे स्टॉल ठिकठिकाणी आहेत. आज भारत जगातली पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. याचं सर्व श्रेय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे संविधान आपल्याला दिलं, त्या संविधानाचं आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केलं.

***<u>जगाच्या पाठीवर सर्वात सुंदर आणि सर्वात उत्तम संविधान जर कुठलं असेल, तर ते भारताचं संविधान आहे. हे संविधान सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडवण्याचं मूलमंत्र घेत तयार करण्यात आलं आहे. आज कोणतीही समस्या देशापुढे असली, तरी त्या समस्येचं निदान, त्याचा उपाय हा भारताच्या संविधानामध्ये पहायला मिळतो.</u>***

आज आपण इथं माणूसकीचा धर्म पाळण्यासाठी जमलो आहे. चंद्र, सुर्य आणि सत्य या तीन गोष्टींव्यतिरिक्त जगात चौथी स्थायी गोष्ट कुठली असेल तर ती बाबासाहेबांचं संविधान आहे असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर देशाला एकतेच्या, समतेच्या, बंधुतेच्या नात्यानं बांधण्याची ताकद बाबासाहेबांच्या विचारामध्ये आणि त्यांनी दिलेल्या संविधानामध्ये आहे,असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

महापरिनिर्वाण-नागपूर/विदर्भ

नागपुरात दीक्षाभूमी इथं देखील बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली आहे. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी बुद्ध वंदना घेण्यात आली. काल मध्यरात्री बारा वाजता समता सैनिक दलाने संविधान चौक इथं बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी आणि समता सैनिक दल मुख्यालय दीक्षाभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्लड फॉर बाबासाहेब' या जागतिक अभियानाअंतर्गत दीक्षाभूमी येथील यात्री निवासात महारक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. या अभियानाचे हे चौथे वर्ष असून यंदाही मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी रक्तदान करून बाबासाहेबांना अभिवादन केलं. उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत यांनी संविधान चौकातील डॉ.बाबासाहेब यांच्या प्रतिमेला आणि बेझनबाग येथील जनसंपर्क कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला

पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी बोलतांना आधुनिक भारताचे शिल्पकार, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित राज्यघटना देशाला अर्पण केली असल्याचं डॉ.राऊत म्हणाले. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा यांसह विदर्भातील सर्व आस्थापनांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आलं.महापरिनिर्वाण दिनानिमित्त आकाशवाणी नागपूर केंद्रात सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांना अभिवादन केलं. देशाच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांच बलिदान देणाऱ्या हुतात्मा सैनिकांसाठी सन्मान म्हणून आजचा दिवस हा सशस्त्र सेना दिवस म्हणून पाळला जातो. त्यानिमित्त आकाशवाणीच्या कर्मचाऱ्यांनी दोन मिनिट मौन पाळून हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. वाशिम शहरात महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध ठिकाणाहून निघालेले कँडल मार्च पहाटे साडे पाच वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहचले. चौकातल्या पुतळ्याला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. त्यानंतर भंते प्रज्ञानंद यांनी उपस्थित बुद्ध अनुयायांना त्रिशरण पंचशील दिले. काल रात्री बारा वाजता भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडी अकोला जिल्हा शाखेच्या वतीने टॉवर चौकातून कॅन्डल मार्च काढण्यात आला. दादरच्या चैत्यभूमीचे दर्शन घेण्यासाठी लाखो अनुयायी रात्री मुंबईकडे रवाना झाले. बुलडाणा जिल्ह्यात देखील आज विविध स्तरातून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ठिकठिकाणी अभिवादन करण्यात आले. त्यानंतर ग्रामीण भागात रक्तदान शिबीर, शहरातून रैली या सह विविध कार्यक्रम संपन्न झाले. गडचिरोली इथं गोंडवाना विद्यापीठात कुलगुरू डॉ.प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली आंबेडकरांचा राष्ट्रवाद' या विषयावर डॉ. प्रकाश राठोड यांचं व्याख्यात पार पडलं.

हंगामी अध्यक्ष

भारतीय जनता पक्षाचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी आज राज्य विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून शपथ घेतली. राजभवन इथं झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळयात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी कोळंबकर यांना हंगामी अध्यक्ष पदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.नीलम गोऱ्हे तसंच इतर मान्यवर उपस्थित होते. उद्यापासून ९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून काम

पाहतील. या अधिवेशनात ते २८८ नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना पदाची शपथ देतील आणि ९ डिसेंबरला विधानसभा अध्यक्षांची निवडणूक घेतील.

स्मार्ट इंडिया हॅकथॉन

सातवे स्मार्ट इंडिया हॅकेथॉन 11 डिसेंबरपासून देशभरातील 51 केंद्रांवर सुरू होणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते या कार्यक्रमाचं दूरदृष्य प्रणाली द्वारे उद्घाटन होणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण हा या देशव्यापी उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमात विविध विद्यार्थी संघ, बहुविध मंत्रालय विभाग आणि उद्योगांनी दाखल केलेल्या समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न करतील अथवा १७ विविध संकल्पनावर आधारित त्यांच्या नवकल्पना सादर करू शकतील. या सर्व संकल्पना राष्ट्रीय महत्वाच्या प्राधान्य क्षेत्रांशी संबंधित आहेत. यामध्ये आरोग्यसेवा, पुरवठा साखळी आणि लॉजिस्टिक, स्मार्ट तंत्रज्ञान, वारसा आणि संस्कृती, शाश्वतता, शिक्षण आणि कौशल्य विकास यांचा समावेश आहे. यावर्षी, 54 मंत्रालये, विभाग, राज्य सरकारे, सार्वजनिक उपक्रम आणि उद्योगांनी 250 हून अधिक समस्या विधाने सादर केली आहेत, ज्यामुळे संस्था स्तरावर, अंतर्गत हॅकाथॉनमध्ये 240 टक्क्यांनी वाढ झाली आहे. नागपूरच्या जि. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा स्मार्ट इंडिया हॅकेथॉनमध्ये समावेश आहे. याबाबत अधिक माहिती देत आहेत डॉ.दिनेश पडोळे -

***११ आणि १२ डिसेबेरला राईसोनी कॉलेज इथे स्मार्ट इंडिया हॅकथॉन इंडिया आहे. हे ११ तारखेच्या सकाळी ८.०० ला सुरू होईल आणि १२ तारखेच्या रात्री ८.०० पर्यन्त राहील. हे प्रॉब्लेम स्टेटमेंट आम्हाला गवरमेन्ट ने दिलेल आहे. त्या करीता प्रत्येक प्रॉब्लेम साठी ५ टीम असे काम करणार आहे. एक आहे एआईसी च इनोव्हेशन आणि ३ मिनिस्ट्री ऑफ स्किल डेवलपमेंटचे प्रॉब्लेम आहेत.***

'देश का प्रकृती परीक्षण'

केंद्रीय आयुष मंत्रालयच्यावतीने देशातील नागरिकांच्या आरोग्यासंदर्भात 'देश का प्रकृती परीक्षण' एक नवीन अभिनव उपक्रम सुरु केला आहे. या उपक्रमांतर्गत आयुर्वेद शास्त्राच्या माध्यमातून आयुर्वेद चिकित्सकांकडून १८ ते ७० वर्ष वयोगटातील सर्व नागरिकांचे प्रकृती परीक्षण करण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्ह्यात या

उपक्रमाची सुरुवात कालपासून करण्यात आली. ही प्रकृती परिक्षण मोहीम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. केंद्रीय आयुष मंत्रालयाने सुरु केलेल्या देश का प्रकृती परीक्षण उपक्रमात नागरिकांना सहभागी होण्यासाठी 'प्रकृती परीक्षण'हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपचा वापर करुन नागरीकांना आपल्या प्रकृती परीक्षणासाठी नोंदणी करता येणार आहे. जिल्ह्यातील नागरीकांनी या ॲपचाही वापर करुन मोहिमेत जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

पुष्प प्रदर्शन

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपवने आणि उद्यान शाखेमार्फत 25 आणि 26 जानेवारी 2025 रोजी विधानभवन परिसरात 50 व्या सुवर्ण महोत्सवी पुष्प प्रदर्शनाचं आयोजन करण्यात येणार आहे. या पुष्प प्रदर्शनात गुलाब आणि हंगामी फुले, कॅक्टस, सक्कुलन्ट, शोभिवंत फुलझाडांच्या कुंड्या, पुष्परचना प्रदर्शित होणार आहे. या प्रदर्शनात पुष्प स्पर्धा आयोजित असून इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी सहायक संचालक उपवने व उद्याने, बांधकाम संकुल, बंगला क्र.39/1, लेडीज क्लब समोर, सिव्हील लाईन, नागपूर या कार्यालयात अथवा 0712-256125 या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

हवामान

फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अद्यापही विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात वाढ दिसत आहे. आज नागपुरात २० पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. तर अमरावती इथं सर्वाधिक 33.4 इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान, नागपूरसह, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आगामी काही तासात हलक्या ते अत्यंत हलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होण्याची शक्यता वर्तवली आहे. वाशीम जिल्ह्यात आज दुपारी मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा या तीन तालुक्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार अवकाळी पाऊस झाला. या पावसाने मंगरूळपिर कृषी उत्पन्न बाजार समितीतील सोयाबीन भिजले आहे. सध्या सोयाबीनला कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हमीभाव मिळत असल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची आवक वाढली आहे.

******